आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र दुपारी  १.३० वाजता

२२  मार्च २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- इसरोच्या ‘आर. एल. व्ही. पुष्पक’ या उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं यशस्वी लँडिंग
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भूतानच्या दौऱ्यावर, पारो विमानतळावर झालं जल्लोषात स्वागत
- दिल्ली उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडी आज राऊज अव्हेन्यू न्यायालयात हजर करणार / याच प्रकरणात बी आर एस च्या के कविता यांना दिलासा द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची ५७ उमेदवारांची यादी जाहीर /महाराष्ट्रातल्या ७ उमेदवारांचा समावेश
- आयपीएल क्रिकेट आजपासून सुरु होणार

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिक क्रीडास्पर्धांच्या उद्घाटन सोहळ्यात भारताचा ध्वज टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल याच्या हाती, पथकाचं नेतृत्व मेरी कोम कडे

**<><><><><><>**

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज सकाळी कर्नाटक मधल्या चित्रदुर्ग चाचणी केंद्रावर  पुनर्वापर करण्याजोग्या ‘आर. एल. व्ही. पुष्पक’ या उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं यशस्वीपणे लँडिंग केलं. संपूर्णपणे स्वयंचलित पद्धतीनं अंतराळ यानाचं संचालन, लँडिंग आणि इंधन व्यवस्थापन केल्याबद्दल, या

अभियानाच्या चमूचं इस्त्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी समाज माध्यमा वर पोस्ट लिहून अभिनंदन केलं आहे. इस्त्रोच्या आजच्या यशस्वी मोहिमेने उपग्रह संचालन, नियंत्रण प्रणाली, लँडिंग गियर आणि डिलेरेशन प्रणाली यांसारख्या क्षेत्रात देशांतर्गत विकसित तंत्रज्ञानाची गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. अंतराळातून परतणाऱ्या उपग्रह प्रक्षेपक वाहनाच्या अतिवेगवान स्वयंचलित लँडिंगसाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाचं आहे. ‘पुष्पक’चं स्वयंचलित यशस्वी लँडिंग करून आणखी एक उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल इस्त्रोच्या वैज्ञानिकांचं माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी अभिनंदन केलं आहे.

**<><><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या समन्स ला आव्हान देणारी याचिका मागे घेतली आहे. उत्पादन शुल्क घोटाळा प्रकरणी ईडीने केजरीवाल यांना नऊ वेळा समन्स बजावलं होतं, तर हे समन्स बेकायदा आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचं केजरीवाल यांनी म्हटलं होतं. दिल्ली उच्च न्यायालयाने केजरीवाल यांना अटकेपासून संरक्षण नाकारल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने काल त्यांना अटक केली. आज त्यांना न्यायालयात हजर केलं जाईल. मुख्यमंत्रीपदावरच्या व्यक्तीला अटक होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. केजरीवाल यांच्या निवासस्थानाच्या परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली आहे, तसंच सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली आहे. आम आदमी पार्टीचे सौरव भारद्वाज आणि मंत्री अतिशी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

केजरीवाल यांच्या अटकेचा आम आदमी पार्टी सह विविध राजकीय पक्षांनी निषेध केला आहे. आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आज दिल्ली आणि इतरत्र निषेधाची निदर्शनं केली. केजरीवाल यांच्या अटकेची कारवाई चुकीची आणि

घटनाबाह्य असल्याची टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वड्रा यांनी केली आहे. सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनीही या कारवाईचा निषेध केला आहे. हे प्रकरण भ्रष्टाचाराविरुद्धच्या कायदेशीर प्रकियेचा भाग असल्याचं भाजपाचे वरिष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी अटकेत असलेल्या भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांचा जामीन अर्ज दाखल करून घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. न्यायमूर्ती संजीव खन्ना, एम. एम. सुंदरेश आणि बेला त्रिवेदी यांच्या विशेष न्याय पीठानं के. कविता यांना, एकसमान धोरणाचं पालन करण्याची सूचना दिली, आणि त्यांनी कनिष्ठ न्यायालयात याचिका दाखल करावी, असे निर्देश दिले. तसंच केवळ राजकारणी आहे, अथवा आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे, म्हणून एखाद्या व्यक्तीला जामीन मिळवण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात जाण्याची परवानगी देता येणार नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

दरम्यान मुख्यमंत्री केजरीवाल यांना अटक झाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली विधानसभेचं आजचं विशेष अधिवेशन रद्द करण्यात आलं आहे. सभागृहाची पुढची बैठक येत्या २७ मार्चला होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या दोन दिवसांच्या भूतानच्या दौऱ्यावर आज सकाळी पारो इथं पोहोचले. भूतानचे प्रधानमंत्री शेरिंग तोबगे यांनी त्यांचं स्वागत केलं. आपल्या या भेटीत प्रधानमंत्री भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक

आणि भूतानचे चौथे राजे जिग्मे सिंगे वांगचुक यांची भेट घेतील. ते भूतानच्या प्रधानमंत्र्यांशी देखील चर्चा करतील.

या दौऱ्यात प्रधानमंत्री थिम्पू इथं भारताच्या अर्थसहाय्यामधून उभारलेल्या अत्याधुनिक 'ग्याल्ट्सुएन जेटसन पेमा मदर अँड चाइल्ड' रुग्णालयाचं उद्घाटन करतील.

भारत- भूतान भागीदारी अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं आपण भूतान मधल्या विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये लिहिलं आहे. प्रधानमंत्र्यांचा हा दौरा सरकारच्या 'शेजारी सर्वप्रथम' या धोरणाला अनुसरून आहे.

**<><><><><><>**

बिहार राज्य आज आपला ११२ वा स्थापना दिवस साजरा करत आहे. १९१२ साली बंगाल प्रांतातून बिहार वेगळा करण्यात आला. या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. सांस्कृतिक परंपरा आणि वैभव यामुळे वेगळं उठून दिसणारं हे राज्य विकासाची मार्गक्रमण वेगानं करत आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

काँग्रेसनं काल लोकसभेसाठी ५७ उमेदवारांची यादी जाहीर केली. अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री नबाम टुकी हे अरुणाचल पश्चिम मतदारसंघातून उभे राहणार आहेत, तर पुदुच्चेरीचे माजी मुख्यमंत्री वैथिलिंगम पुदुच्चेरी मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवणार आहेत. लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीररंजन चौधरी पश्चिम बंगालमधील बेहरामपूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

काँग्रेसच्या या यादीत महाराष्ट्रातले सात उमेदवार आहेत. पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर, लातूरमध्ये शिवाजीराव काळगे, सोलापूरमध्ये प्रणिती शिंदे, कोल्हापूरमध्ये छत्रपती शाहू महाराज, नंदूरबारमध्ये गोवल पाडवी, अमरावतीमध्ये बळवंत वानखेडे, तर नांदेड लोकसभा मतदारसंघातून वसंतराव चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं साजिद खान पठाण यांना उमेदवारी दिली आहे.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीनंही आपली तिसरी यादी काल जाहीर केली. त्यात नऊ उमेदवारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आज जागतिक जल दिन आहे. पाण्याच्या बचतीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १९९२ मधल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. सर्वसाधारणपणे २२ मार्चपासून वातावरण बदलायला सुरुवात होते. तात्विकदृष्ट्या पावसाळ्याची सुरुवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो म्हणून जागतिक जल दिनासाठी २२ मार्चची निवड केली. “शांततेसाठी पाणी” ही यंदाच्या जल दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

जागतिक जल दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर लिहीलं आहे की, सरकार पाण्याच्या शाश्वत व्यवस्थापनाबद्दल तसंच या मौल्यवान स्त्रोताचं संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे.

**<><><><><>**

मुंबईतले ऑस्ट्रेलियाचे नवनियुक्त राजदूत पॉल मर्फी यांनी काल मुंबईत राजभवनात राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. भारत हा ऑस्ट्रेलियाचा विश्वासू भागीदार

आहे. व्यवसाय आणि व्यापारातलं सहकार्य वाढवण्याबरोबरच महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या उच्च शिक्षण कौशल्य विकास, दृक् -श्राव्य निर्मिती उद्योग, कला आणि संस्कृती अशा क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करू, असं मर्फी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><><>**

चेन्नईच्या एम. ए चिदंबरम स्टेडियमवर आजपासून इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट सामने सुरु होत आहेत. गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात या हंगामाचा सलामीचा सामना होईल. रात्री ८ वाजता सामना सुरु होईल. महेंद्रसिंग धोनी आणि विराट कोहली एकमेकांविरुद्ध खेळणार असल्यामुळे आजचा सामना बघण्यासाठी क्रिकेट प्रेमी उत्सुक आहेत.

**<><><><><><>**

यंदाच्या पॅरिस ऑलिंपिक क्रीडास्पर्धांच्या उद्घाटन सोहळ्यात भारताचा ध्वज टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल याच्या हतात असेल. भारतीय ऑलिंपिक संघटनेनं काल ही घोषणा केली. भारतीय चमूचं नेतृत्व  मुष्टियुद्धपटू मेरी कोम कडे सोपवण्यात आलं आहे, तर हिवाळी क्रीडाप्रकारातला  खेळाडू शिवा केशवन उपप्रमुख असेल.

गगन नारंग नेमबाजीच्या पथकाचं नेतृत्व करणार आहे.  या ऑलिंपिक स्पर्धांमधे १९ भारतीय नेमबाजांनी आधीच प्रवेश मिळवला असून आणखीही नेमबाज पात्र ठरण्याची शक्यता आहे. नेमबाजीसाठी आतापर्यंतचा सर्वात मोठा संघ यंदा भारताचं प्रतिनिधित्व करणार आहे.

**<><><><><><>**

बिहारमध्ये सुपौल जिल्ह्यात आज सकाळी कोसी नदीवर बांधल्या जात असलेल्या एका पुलाचा भाग कोसळून एक जण मृत्युमुखी पडला, तर १० जण गंभीर रित्या जखमी झाले. पुलाच्या कोसळलेल्या भागाच्या ढिगाऱ्याखाली सहा कामगार अडकले असून, या ठिकाणी बचाव कार्य सुरु असल्याचं स्थानिक पोलीस सूत्रांनी सांगितलं. हा पूल मधुबनी आणि सुपौल या जिल्ह्यांना  जोडणाऱ्या ‘भारतमाला’ प्रकल्पाचा एक भाग आहे.

**//<><><><><><>//**